**SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE**

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART – TWO

गुरुवार, दिनांक १९ एप्रिल, २०१८

# अधिसूचना

क्र. : ३१/२०१८ दिनांक : १९.४.२०१८

**विषय : पश्चिम विभाग व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्तरावरील पुरूष व महिला संघासोबत नियुक्त करण्यात येत असलेल्या चमू व्यवस्थापक व चमू प्रशिक्षक यांना प्रदान करण्यात येत असलेल्या प्रतिदिन प्रतिव्यक्ती रूपये १३०/- इतक्या दैनंदिन भत्त्याशिवाय प्रतिदिन प्रतिव्यक्ती रूपये ३७०/- इतका सहचर्य भत्ता प्रदान करण्याबाबत.**

सर्व संबंधितांच्या माहितीकरिता अधिसूचित करण्यात येते की, पश्चिम विभाग व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ पुरूष व महिला संघातील विविध क्रीडा स्पर्धेत विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्याकरिता निवड समितीकडून स्पर्धानिहाय चमुची निवड करण्यात आल्यानंतर सर्वसंबंधित संघाचे व्यवस्थापनासाठी तसेच संघातील खेळाडूंच्या प्रशिक्षण व मार्गदर्शनाकरिता पुरूष व महिला संघातील प्रत्येक चमुसोबत चमू व्यवस्थापक व चमू प्रशिक्षक यांची नियुक्ती करण्यात येते.

वरीलप्रमाणे पुरूष व महिला संघातील चमुसोबत नियुक्त करण्यात येत असलेल्या चमू व्यवस्थापक व चमू प्रशिक्षक यांना सद्यास्थितीत नियमानुसार प्रतिव्यक्ती प्रतिदिन रूपये १३०/- इतका दैनंदिन भत्ता प्रदान करण्यात येतो. परंतु प्रतिदिन रूपये १३०/- इतक्या दैनंदिन भत्त्याच्या रकमेतून चहा, फराळ व भोजनाचा खर्च करणे अशक्य होते व त्यामुळे चमू व्यवस्थापक व चमू प्रशिक्षक यांची मोठ्याप्रमाणात गैरसोय होते ही बाब विचाराधीन होती.

सदर वस्तुस्थिती विचारात घेऊन पश्चिम विभाग व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ पुरूष व महिला संघातील विविध स्पर्धेसोबत नियुक्त करण्यात येत असलेल्या चमू व्यवस्थापक व चमू प्रशिक्षक यांना प्रतिदिन रूपये १३०/- इतक्या दैनंदिन भत्त्याशिवाय प्रतिव्यक्ती प्रतिदिन रूपये ३७०/- इतका सहचर्य भत्ता (Accompanying allowance) प्रदान करण्याकरिता व्यवस्थापन परिषदेची मान्यता मिळण्याच्यादृष्टीने दिनांक ०३.०३.२०१८ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीच्या सभेसमोर विभागाने विषय सादर केला होता. त्यानुषंगाने दिनांक ०३.०३.२०१८ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने विषय क्र. ०६ अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव शिफारस केली होती.

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे व्यवस्थापन परिषदेने दिनांक १५.०३.२०१८ रोजी संपन्न झालेल्या सभेत विषय क्र. २९ अन्वये पश्चिम विभाग व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ पुरूष व महिला संघातील विविध स्पर्धेसोबत नियुक्त करण्यात येत असलेल्या चमू व्यवस्थापक व चमू प्रशिक्षक यांना प्रतिदिन रूपये १३०/- इतक्या दैनंदिन भत्त्याशिवाय प्रतिव्यक्ती प्रतिदिन रूपये ३७०/- इतका सहचर्य भत्ता (Accompanying allowance) आर्थिक वर्ष २०१८-२०१९ पासून प्रदान करण्यास मान्यता प्रदान केली असून सदर सहचर्य भत्त्याचे दर संबंधितांना शैक्षणिक सत्र २०१८-२०१९ पासून लागू करण्यात येईल व सदर भत्त्याचे शोधन विद्यापीठाचे अर्थसंकल्पातील i) T.A.D.A. & accompanying allowance to Managers & Coaches & T.A.D.A. to Participant players in A.I.U. Tournaments या अर्थशिर्षातून भागविण्यात येईल.

स्वा/-

(डॉ.अजय देशमुख)

कुलसचिव

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ